**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट दिनांक - २१/१२/२०२२**

**दि.२०/१२/२०२२ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ७२५/२०२१ भा.द.वि.कलम ३९२,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२०/१२/२०२२ रोजी ११.०० वाजेचे सुमारास हेरंब अपार्टमेंटया सोसायटीचे गेटसमोर हृदय हॉलचे पाठीमागे ,सेक्टर ४,मोशी प्राधिकरण पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२०/१२/२०२२ रोजी १८/३२ वा |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी वय-५६ वर्षे |
| आरोपी | :- | दोन अनोळखी इसम (अंदाजे वय २० ते २५ वर्षे ) |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी संगनमत करुन ८०,०००/- रू किमतीचे २७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दोन पदर असलेले मिनी गंठण फिर्यादी यांस पत्ता विचारण्याचे बहाण्याने त्यांचे गळयातुन जबरदस्तीने हिसकावुन चोरुन नेले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि तरंगे ९६८९९२७५९२ |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | निगडी ८५७/२०२२ भा.द. वि. कलम ३५४(ब)ड(२), ५०६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२०/१०/२०२२ रोजी १७/०० वा. सुमा. थरमॅक्स चौक, रामनगर निगडी,पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२०/१२/२०२२ रोजी १४/५९वा |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी वय-२३ वर्षे |
| आरोपी | :- | मानतेष सिध्दू यतनाळकर थरमॅक्स चौक, रामनगर निगडी,पुणे |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हया निगडी येथे एकटी घरात रहात असताना त्यांचे ओळखीचा इसम आरोपी याने घरात येवून फिर्यादी यांना तू माझे सांगणेप्रमाणे वाग माझे सोबत रहा माझे सोबत बोल जर तसे केले नाही तर माझेकडे हत्यार असून मी तुला व तुझ्या नव-याला मारून टाकीन अशी धमकी देवुन फिर्यादी यांचे अंगाावरील सर्व कपडे काढून खाली गादीवर झोपवून फिर्यादीशी जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला असता फिर्यादीने त्यास मनाई केल्याने त्याने फिर्यादीशी अति प्रसंग न करता त्याने त्याचा मोबाईल नंबर ८०८०१४३७६७ यामध्ये नग्न व छातीचे फोटो काढून तू जर गप्प बसली नाही व मला फोटो काढून दिले नाहीस तसेच तू जर पोलीसांना सांगितले तर मी तुझे माझ्या मोबाईल मध्ये काढलेले सर्व फोटो तुझ्या नव-याला पाठविण असे म्हणून धमकी देवून त्याने त्याचे मोबाईल मधील फिर्यादीचे नग्न व छातीचे काढलेले फोटो फिर्यादीचे मोबाईलचे व्हाटसअपवर पाठवून दिले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि गणेश गायकवाड ९५५२८८५१०० |

३.

पोस्टे व गु.रजि.नं. :- निगडी ८५८/२०२२ भा.दं.वि.कलम ३५३,३७९,५११,३३२,२९४,३४ प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२०/१२/२०२२ रोजी १७.३० वा.चे सुमारास पी एम पी एम एल बस स्टॉप निगडी,पुणे या ठिकाणी

गुन्हा दाखल :- दि.२०/१२/२०२२ रोजी १७/३६ वा.

फिर्यादी :- शत्रुघ्न पांडूरंग नेवरे,वय - ४८ वर्ष, धंदा - नोकरी रा - सर्व्हे नंबर ४ संमनगर, जुनी सांगवी पुणे-२७

आरोपी :- १)महीला आरोपी वय २२ वर्षे
२)विनोद संजय बाजड वय ३५ वर्षे रा सदर
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पी एम पी एम एल या सार्वजनिक वाहतूक संस्थेत कांट्रोलर म्हणून नोकरीस असून फिर्यादी हे आपले सरकारी कर्तव्य करित असतान यातील आरोपी यांनी आपसात संगणमत करून प्रवासी महिलेचे पर्सची चैन उघडून चोरी करत असताना फिर्यादी यांनी त्यांना हटकल्याने त्यांनी फिर्यादीशी झटापटी करून धक्का बुक्की करून हाताने मारहाण करून शिवीगाळ करून फिर्यादी हे त्यांचे सरकारी कर्तव्य पार पाडीत असताना फिर्यादीचे सरकारी कामात अडथळा निर्माण केला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि ताकतोडे ९९२२५००८३२

४.

पोस्टे व गु.रजि.नं. :- चिंचवड ५७२/२०२२ भादवि कलम ३७९

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१७/१२/२०२२ रोजी १४/३० वा ते १५/१० वाजताचे दरम्यान रेल विहार कॉर्नर चौपाटीजवळ सर्व्हीस रोड लगत चिंचवड पुणे

गुन्हा दाखल :- दि.२०/१२/२०२२ रोजी २० /४४ वा.

फिर्यादी :- धनंजय दयानंद गोळे वय ३४ वर्षे व्यवसाय – नोकरी रा. निर्वाना बियाँड, कातळे वस्ती, किवळे ता. हवेली जि. पुणे.ता माळशिरस जि सोलापुर

आरोपी :- अज्ञात चोरटा

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची २०,००० /- रु किंमतीची एक काळया रंगाची बजाज कंपनीची पल्सर मो.सा तिचा आरटीओ नंबर एम एच ०७ वाय ३०७१ ही नमुद ठिकाणी लॉक व पार्क करुन ठेवली असता ती कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने स्वतःचे आर्थिक फायदयासाठी चोरुन नेली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- मपोना मसरे ९७३०५७५९६१

५.

पोस्टे व गु.रजि.नं. :- एमआयडीसी भोसरी ७२६/२०२२ भादविकलम २७९,३३७ सह मोटार वाहन कायदा कलम ११९/१७७ प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२०/१२/२०२२ रोजी ११.३० वा
त्रिशुल गॅरेज समोर सार्वजनिक रोडवर एमआयडीसी चौक भोसरी पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.२०/१२/२०२२ रोजी २१/०७ वा

फिर्यादी :- अजिंक्य विक्रम जाधव वय २६ वर्ष धंदा-व्यवसाय, रा. ,बुट्टे पाटील प्रेस्टीज बिल्डींग जंगली महाराज मंदिराचे पाठीमागे शिवाजीनगर पुणे

आरोपी :- शिवानंद ब्याकोड अंदाजे वय ६० वर्षे, रा.विरभद्रनगर बाणेर पुणे

**आरोपी अटक नाही**

तपशिल :- वर नमुद ता वेळी ठिकाणी वाहन क्रं एम एच १२ केई ८६१ वरील चालक नमुद आरोपी याने त्याचे ताब्यातील वाहन बेदरकानपणे व हयगयीने चालवुन फिर्यादी यांचा भाऊ नामे विश्वजीत विक्रम जाधव वय-३० वर्षे, यास पाठीमागुन जोरात धडक देवुन त्यास गंभीर जखमी केले आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोना १५६६ हाके ९६५७७२०९८६

६.

पोस्टे व गु.रजि.नं. :- तळेगाव दाभाडे ५३४/२०२२ भा.द.वि. कलम ३०४ अ, २७९ सह मो. वा का १३४,१८४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२०/१२/२०२२ रोजी ०५/१७ वा. गेट समोर इंडियन ऑइल पेट्रोलपंपाजवळ जुना मुंबई पुणे हायवे तळेगाव दाभाडे ता.मावळ जि. पुणे

गुन्हा दाखल :- दि.२०/१२/२०२२ रोजी १०.३१ वा

फिर्यादी :- किरण सुरेश पठारे सहाय्यक पोलीस निरीक्षक तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

आरोपी :- अज्ञात वाहन चालक

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी सदर ठिकाणी अनोळखी पुरूष जातीचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षाचे इसमाचा मृत्यु हा कोणाच्यातरी अज्ञात वाहनाच्या धडकेने झाल्याचे दिसत आहे. सदर वाहन चालक जखमी मयतास मदत न करता निघुन गेला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि पठारे ८८८८८१०९५७

७.

पोस्टे व गु.रजि.नं. :- हिंजवडी १२३४/२०२२ भा.द.वि.कलम भा.द.वि.क.३८५,३८७,३४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०९/०३/२०२२ रोजी ११/३० ते १२/०० वा. चे सुमारास माझे गारवे हुंडायी, सर्व्हे नंबर १३६/१/अ/४, वाकड, पुणे येथील माझे ऑफिस मध्ये तसेच व्हॉटसअपवर

गुन्हा दाखल :- दि.२०/१२/२०२२ रोजी २३.२८ वा.

फिर्यादी :- विनायक किशोर गारवे वय ३९ वर्षे धंदा- व्यवसाय, रा. घर नंबर ६२६/२१, नवी सांगवी पुणे.

आरोपी :- १)सोमनाथ लाहोट वय अंदाजे ४० वर्ष रा. साई रेसिडेन्सी, तळेगांव दाभाडे, रोहन हॉटेल शेजारी, तळेगांव चाकण रस्ता, तळेगांव पुणे
२)त्यासोबतचा अनोळखी इसम
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- वर नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र.१ व त्याचे सोबतचा अनोळखी इसम यांनी दिनांक ०९/०३/२०२२ रोजी सकाळी ११/३० ते १२/०० वा. चे सुमारास फिर्यादी यांचे गारवे हुंडायी, सर्व्हे नंबर १३६/१/अ/४, वाकड, पुणे येथील ऑफिसमध्ये ते व व्यवसाय पार्टनर तसेच कामगार यांचेसह बसले असतांना फिर्यादी यांचे वडगांव येथील बांधकाम साईटचा वाद मिटवून देतो असे फिर्यादी यांना बोलून त्यांचेकडे ५० लाख रुपये रोख व १६४०० स्क्वेअर फुट, बांधकाम क्षेत्र, वडगांवचे बांधकाम साईटवर अशी मागणी करुन तसेच फिर्यादी यांनी पैसे दिले नाही तर त्यांना काम करु देणार नाही व त्यांना कायमचा संपवून टाकील अशी धमकी दिली तसेच त्या दोघांनी फियार्दीकडे रागाने पाहत तुला बघून घेतो तु काम कसे करतो अशी दोघांनी फिर्यादी यांना धमकी दिली.व दिनांक १०/०३/२०२२ रोजी फिर्यादीचे ऑफिसचा कर्मचारी मनोदिप याचा मोबाईल नंबर ८८८८८४५७७४ यावर आरोपी क्र.१ याचे मोबाईल नंबर ८३७९०६२१२७ वरुन व्हॉटसअप मॅसेज करुन धमकी दिली आहे तसेच प्रोजेक्टचे आधारे खंडणीची मागणी करित आहे म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि साळुंखे ९०११०११४१७

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | रावेत १५२/२०२२ भादवि कलम ४५२,३५२,५०४,५०६,४४७,४४८, ३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२०/१२/२०२२ रोजी १७.३० वा चे सुमारास सर्व्हेनं ८६/२, रावेत गावठाण ता हवेली जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२०/१२/२०२२ रोजी २३/०६ वा |
| फिर्यादी | :- | पुंडलीक नागु पालेकर वय ७६ वर्षे व्यव सेवानिवृत्त रा. सेक्टर २५ प्लॉट नं.३७८ सिंधु नगर प्राधिकरण पुणे |
| आरोपी | :- | १)प्रविण विठठल खानेकर रा.वनदेव नगर कॉलनी लेन नं ०२.सदगुरु सदन आनंद हॉस्पीटल जवळ थेरगाव फाटा डांगे चौक पुणे<br>२) महीला आरोपी<br>३) प्रकाश विठ्ठल खानेकर रा सदर **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व फिर्यादीचे सहकारी नामे भुजंगराव शंकरराव खेनट असे सर्व्हेनं ८६/२, रावेत गावठाण ता हवेली जि पुणे येथे थांबलेलो असता आरोपी क्र.१ याने आमच्या संस्थेचे पत्र्याचे शेडला जोरात धक्का देवुन पत्र्याचे दरवाजाचे नुकसान करुन आमचे संस्थेत त्आरोपी क्र.१ याचे पत्नी आरोपी क्र.२ हिचेसह प्रवेश करुन फिर्यादीला जोर जोरात शिवीगाळ करुन तुला आता सोडत नाही असे म्हणुन फिर्यादीचे अंगावर धावुन येवुन फिर्यादीची गचंडी पकडुन तुलाच जास्त मस्ती आली आहे तुला बघुन घेतो असे म्हणुन फिर्यादी बरोबर असलेले भुजंगराव खेनट यांना देखील वाईट वाईट शिवीगाळ केली. मी येथेच थांबुन राहणार असे म्हणुन आमच्या जागेचा ताबा घेवुन आमच्या संस्थेच्या सर्व्हेनं ८६/२, रावेत गावठाण ता हवेली जि पुणे या जागेत बळजबरी अतिक्रमण करुन आमचे संस्थेच्या रुमचे कुलुप तोडुन आतमध्ये प्रवेश केला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि शिकलगार ९८२२७८६६९६ |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिंचवड ५७१/२०२२ भा द वी कलम ४२०,४०६ ,४६७,४६८,४७१,१२० बी प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | सन २००५ पासुन ते दि.२२/०८/२०२२ रोजी पर्यंत हवेली क्रमांक ०५ कामीनी हॉटेल समोरचिंचवड पुणे. प्रेमलोकपार्क भोईरनगरचिंचवड पुणे ३३ येथे घडला असे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२०/१२/२०२२ रोजी १७/५० वा. |
| फिर्यादी | :- | नरेंद्र सुभाष भोईर वय ४२ वर्षे व्यवसाय - व्यवसाय रा. प्लॉट नंबर ३ भोईरनगरचिंचवड पुणे ३३ |
| आरोपी | :- | १)भाऊसाहेब भोईर यांनी२)डॉक्टरडॉ. रणजित सिंह माने३) नितीन कन्हैयालाल भन्साळी रा. शिवाजीनगर पुणे ४)अरुणा महेंद्र आगळे रा.घाटकोपर मुंबई<br>५) बाबु म्हेत्रे रा. चिंचवड पुणे. |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे चुलत भाउ आरोपी १ यांनी आरोपी २ ते ५ यांचेसह संगणमत करुन चुकीचे मृत्युपत्र तयार करुन त्याचा वापर करुन वाटणीपत्रा प्रमाणे त्यांचे वाटयाला आलेली मिळकत हडप करण्याचे उद्देशाने आरोपी १ यांचे नावावर करुन घेतली आहे तसेच बांधकाम व्यवसायीक आरोपी क्र ५यांनी ठरलेप्रमाणे फिर्यादी यांचे आजोबा सोपानराव भोईर यांना देण्यात येणा-या सदनिकेमध्ये त्यांचा हक्क असल्याचे माहित असताना देखील सदरची सदनिका त्यांना पुर्वकल्पना अथवा त्यांची सहमती न घेता ती एकटया आरोपी १ यांचे नावे करुन देवुन त्यांना त्यांचे हक्काने येणा-या मिळकतीपासुन वंचीत ठेवुन त्यांची आर्थिक फसवणुक केली आहे |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मोरे ९८५०४८२०२० |